वाचा :- १) या कार्यालयाचे निलंबन आदेश क्र.अस्था५/९१५/२०१६ दि. २३/०८/२०१६
२) या कार्यालयाचे ज्ञापन क्र.आरोग्य/अस्था५/११६/२०१७ दि. ०१/०२/२०१७
३) या कार्यालयाचे पत्र क्र.आरोग्य/आस्था५/१२०२/२०१७ दि. ०५/०९/२०१७
४) या कार्यालयाची मंजुर टिपणी दि २९/१२/२०१७

---

**आदेश**

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**
जा.क्र.साप्रवि/आस्था५/९५५/१७
नाशिक दिनांक:२९/१२/२०१७

ज्याअर्थी श्रीमती. रेखा नथु जाधव, आरोग्य सेविका, या प्राथमिक आरोग्य केंद्र.सोनज, उपकेंद्र. सावकारवाडी, ता.मालेगाव, जि.नाशिक येथे कामकाज करीत असतांना त्याकामी अनधिकृतपणे गैरहजर राहतात, शासन नियमाप्रमाणे मुख्यालयी राहत नाही, कामकाजात हलगर्जीपणा करणे, ग्रामस्थांना लसीकरण, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया केसेस उदिष्ट, सर्वेक्षण रक्त नमुने, पाणी नमुने तपासणी, गरोदर माता प्रसुती इ.उदिष्ट्य पुर्ण न करता आरोग्य सेवेपासुन वंचीत ठेवने अशा प्रकारच्या गंभिर स्वरुपाच्या कामाच्या तक्रारी असल्याने श्रीम.जाधव, यांनी नियमबाहय वर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ च्या १० चा भंग केला असल्याने त्यांचेविरुद्ध महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (२) अन्वये जिल्हा परिषद सेवेतुन दिनांक २३/०८/२०१६ पासुन निलंबित करण्यात आलेले आहे.

श्रीम.जाधव, निलंबित आरोग्य सेविका यांना उक्त वाचा क्र.२ कार्यालयीन ज्ञापन बजावुन उक्त संदर्भ-३ अन्वये श्रीम.जाधव आरोग्य सेविका यांचे विरुध्द परिशिष्ट १ ते ४ मधील दोषारोपाचे चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांचे नेमणूक करण्यात आलेली असुन. सदर खाते चौकशी अद्याप प्रलंबित आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (२) नियम ३ (५) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक श्रीम.रेखा नथु जाधव,निलंबित आरोग्य सेविका प्राथमिक आरोग्य केंद्र.सोनज, उपकेंद्र.सावकारवाडी ता.मालेगांव व निलंबन काळातील मुख्यालय प्राथमिक आरोग्य केंद्र. अंबासन, उपकेंद्र. बिजोरसे, ता.बागलाण यांचे निलंबन संपुष्टात आणुन त्यांना चौकशी अधिकारी यांचे निकालाचेअधिन राहुन जिल्हा परिषद सेवेत पुर्नस्थापित करण्यात येत आहे. श्रीम.जाधव,आरोग्य सेविका यांना प्राथमिक आरोग्य केंद्र. कळवाडी उपकेंद्र. ओपेडी ता. मालेगाँव जि.नाशिक येथे पदस्थापना देणेत येत आहे. श्रीम.जाधव यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे.

श्रीम.रेखा नथु जाधव, आरोग्य सेविका (महिला) यांचे विरुध्द सुरु असलेल्या खाते चौकशीचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर त्यांचे निलंबन कालावधी बाबत निर्णय घेणेत येईल.

सदर आदेशाची नोंद श्रीम.रेखा नथु जाधव,आरोग्य सेविका (महिला) यांच्या मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

Deepak 29/12
(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नाशिक

**प्रति,** श्रीम. रेखा नथु जाधव,आरोग्य सेविका (महिला) निलंबन काळातील मुख्यालय प्राथमिक आरोग्य केंद्र. अंबासन
उपकेंद्र. बिजोरसे ता. बागलाण जि.नाशिक.
व्दारा : तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती, बागलाण

Deepak 29/12
(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नाशिक

प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती बागलाण
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती मालेगांव
प्रत :- वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र अंबासन ता बागलाण
प्रत :- वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र कळवाडी ता मालेगांव
प्रत :- मध्यवर्ती माहिती तंत्र कक्ष (आयटीसेल) सामान्य प्रशासन विभाग जि.प. नाशिक